

।। श्री स्वामी समर्थ ।।

# ।। स्वामी स्तुती ।।

**श्री गणेशाय नमः**
**श्री दत्तात्रयाय नमः**
**श्री स्वामी समर्थाय नमः**
**श्री सरस्वत्यै नमः**

करी पद्ममाथा किरीटी झळाळी
प्रभा कुंडलांची शरीरा निराळी ।
कांती ही मोहक असे सद्गुरूंसी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।१।।

जयाच्या रथासी एकच सारथी पाही
देखता क्षणी शत्रुलाही मोही
असा हो सारथी जिंकून राहे विश्वासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।२।।

समस्ता सुरांमाजी तू जाण चर्या
म्हणोनीच त्या नाश स्वामी वर्या ।
दुजा देव तो दाखवा असे स्वयं प्रकाशी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।३।।

महामोह तो अंधकारासी नाशी
प्रभा शुध्द सत्त्वाची अजान नाशी ।
अनाथा कृपा जो करी नित्य ऐसी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।४।।

कृपा ज्यावरी होय त्या स्वामींची
न पाहू शके शत्रू त्याला विरीची
उभे राहती सिध्दी होऊनी दासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।५।।

युगे मंत्र-कल्पांत ज्याचे नी होती
हरी ब्रह्मरूद्रादी जो बोलिजेती ।
क्षयांती महाकाळ रूपे प्रकाशी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।६।।

असे हा माय बाप सर्व जगासी
नसे दुजा श्रेष्ठ जाणी तू खासी ।
असे अन्नदाता समर्था जनासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।७।।

जसा भ्रमर रमती रंगीत फुलांसी
तसा हा नाथ मोहती बालकासी ।
सांडोनी असत्य सत्य धर्म तो गवसी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।८।।

दारिद्र्य शाप सर्व आहे लाचाळ
फुलती सर्वांग सर्व होऊनी मवाळ
मरदुनी त्यासी असा आहे तो कर्दनकाळासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।९।।

स्वामी नाथ निरंजन असे ते यतिश्वर
राहुनी दिगंबर चौथा दत्तावतार ।
त्यासी पाहुनी भयही लाचार होसी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।१०।।

फिरता फिरता येसी प्रज्ञापुरासी
वटवृक्षाच्या छायेत ते ठाण मांडसी ।
अपरंपार लीला तेथून ते करीसी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।११।।

आहे अजुनी वास तेथील वटवृक्षापाशी
मनात ठासती ‘भिऊ नको मी आहे पाठीशी’
‘निश्चिंत जा निश्चिंत रहा’ असे सतत बोलसी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।१२।।

फळे चंदने आणि पुष्पे करोनी
पुजावे वरी एक निष्ठा धरूनी
मनी इच्छिले पाविजे त्या सुखासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।१३।।

नमस्कार साष्टांग बापास भावे
करोनी तया स्वामी लागीच ध्यावे
दरिद्रे सहस्त्रादि जो क्लेश नाशी
नमस्कार त्या स्वामी योगेश्वरासी ।।१४।।

फोडोनी टाहो बोलवी त्या स्वामींसी
निर्भय करोनी या बालकास रक्षसी
गोंजरसी गोमाता जशी आपल्या पारडासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्‍वरासी ।।१५।।

शशी तारका गोवूनी जो ग्रहांते
त्वरे मेरू वेष्टोनिया सागर तळाते ।
भ्रमे जो सदा लोक रक्षावयासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्‍वरासी ।।१६।।

राजा बलवान आहे या जगात
प्रजेचे सुख तेचि पाहतात
जननी आई आहे या विश्‍वासी
नमस्कार त्या स्वामी योगेश्‍वरासी ।।१७।।

नमन करी तो त्रिवार नतमस्तक होऊन
ठेऊनी पाठीवरी हात करी मायेचे आच्छादन ।
‘भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी’ आहे असे बोलसी
नमस्कार त्या स्वामी योगेश्‍वरासी ।।१८।।

ही ‘‘स्वामी स्तुती’’ रोज अगरबत्ती लावून स्वामींसमोर पठण केल्याने निरंतर सुख प्राप्त होते. भय नष्ट होऊन अभय मिळते. चोरीचे भय राहत नाही. गर्भवती स्त्रीने ९ ही महिने ही स्तुती वाचल्याने स्वामींचा आशीर्वादयुक्त संतती प्राप्त होते.
कर्जमुक्तीसाठी ७ वेळा ५३ दिवस वाचून ५४ व्या दिवशी ५४ मणी सूत्रात गोवून ती माला गळ्यात धारण करावी. (मणी कसलेही चालतील)
भिती वाटत असल्यास ३ वेळा वाचावे व विभूती लावावी. (अगरबत्तीची विभूती)